स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
**संचालक** (अतिरिक्त कार्यभार)

## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२३–२४/७१०    दि. २९/०२/२०२४

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : जागतिक जल दिन (२२ मार्च) उपक्रम साजरा करणेबाबत

महोदय,

मा. शिक्षण संचालक,(उच्च शिक्षण), राज्य कार्यक्रम सचिवालय, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या पत्रानुसार जागतिक पातळीवर २२ मार्च हा दिवस ‘जागतिक जल दिन’ म्हणून साजरा करावा असे निर्देशीत करण्यात आले आहे. वैयक्तीक व सार्वजनीक स्तरावर पाण्याला महत्त्व प्राप्त करून देण्यासाठी तसेच पुरक वातावरण तयार करण्यासाठी जागतिक जल दिनाने महत्वाची भूमिका बजाविली आहे. वर्ष २०२४ करिता “Water for Peace- शांततेसाठी पाणी” ही संकल्पना घेऊन २२ मार्च हा दिवस ‘जागतिक जल दिन’ म्हणुन साजरा करण्यात येणार आहे. जागतिक जल दिनाच्या निमित्ताने उत्कृष्ट काम करणाऱ्यांना राज्य व जिल्हा स्तरावर प्रोत्साहनपर पुरस्कार देण्यात येणार आहेत. शासन निर्देशानुसार आपल्या महाविद्यालयामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करून जागतिक जल दिन साजरा करण्यात यावा. तसेच अधिक माहितीकरिता व उचित कार्यवाहीसाठी सोबतच्या पत्राचे अवलोकन करावे.

आपल्या महाविद्यालयात रासेयो स्वयंसेवकांमार्फत उपक्रमांचे आयोजन करावे. तसेच शासन निर्देशानुसार सदर उपक्रम राबवून त्याबाबतचा सविस्तर अहवाल व छायाचित्रे http://tinyurl.com/YEWS-Green-Club_action या ग्रीन क्लबच्या ॲक्टीव्हिटी रिपोर्ट लिंकद्वारे दि. १५ मार्च, २०२४ पर्यंत सादर करावा, विहित मुदतीनंतर आलेल्या अहवालांचा ग्रीन क्लब प्रोत्साहनपर पुरस्काराच्या अंतिम निवडीसाठी विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी. कळावे, ही विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : मा. शिक्षण संचालक,(उच्च शिक्षण), राज्य कार्यक्रम सचिवालय, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय,.महाराष्ट्र राज्य,
४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर पुणे-४११ ०१६
Web : www.dhepune.gov.in E-mail: mavi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९

क्रमांक- उशिसं/UNICEF/मवि-१/ ८८७ दि. 12 FEB 2024

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,

प्राचार्य/संचालक, सर्व शासकीय महाविद्यालये/ संस्था,

कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे

विषय: जागतिक जल दिन (२२ मार्च) उपक्रम महाविद्यालय स्तरावर साजरा करणेबाबत

संदर्भ: १. संचालनालयाचे पत्र क्रमांक संकीर्ण २०२२/ प्र.क्र.१२९/विशी-५ दिनांक १३/०१/२०२३, पत्र क्र. ७३१५, ७३२४ दि. २०.०६.२०२३
२. मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य आणि मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या जागतिक जलदिन साजरा करण्याबाबतच्या दिनांक ३१ जानेवारी २०२४ रोजीच्या सूचना

जागतिक पातळीवर २२ मार्च हा दिवस **'जागतिक जल दिन'** म्हणून साजरा केला जातो. दरवर्षी जागतिक जल दिन एक विशेष संकल्पना घेवून साजरा केला जातो. इ.स. १९९४ पासून पाणी बचतीचे संदेश घेऊन प्रतिवर्षी जागतिक जल दिन साजरा करण्यात येत आहे. वर्ष २०२४ करिता **'Water for Peace- शांततेसाठी पाणी'** ही संकल्पना घेऊन २२ मार्च हा दिवस **'जागतिक जल दिन'** म्हणून साजरा केला जाणार आहे. वैयक्तीक व सार्वजनीक स्तरावर पाण्याला महत्व प्राप्त करून देण्यासाठी तसेच पुरक वातावरण तयार करण्यासाठी जागतिक जल दिनाने महत्वाची भूमिका बजाविली आहे. पाण्यामुळे समृद्धी येण्याबरोबरच शांतता ही साधता येऊ शकते यावर या संकल्पनेत भर देण्यात आला आहे. यासाठी राज्यातील महाविद्यालयात असलेल्या युवकांच्या सहकार्याने पाणी बचतीच्या संदेशासोबत महाविद्यालयातील पाणी पुरवठ्याच्या सोयी-सुविधा अद्यायावत आणि दुरुस्त करण्यात याव्यात तसेच जागतिक जलदिन निमित्त खालील प्रमाणे उपक्रम राबविण्यात यावेत.

वरील संदर्भ नुसार, महाराष्ट्र शासन राज्यातील १३ जिल्ह्यांतील उच्च व तंत्रशिक्षण महाविद्यालयात **'युवकांच्या (youth students) मार्फत नैसर्गिक संसाधनांचे सरंक्षण व पाण्याची बचत'** हे अभियान राबविले जात आहे. संदर्भ

क्रमांक २ आणि ३ नुसार राज्यातील सर्व जिल्ह्यातील महाविद्यालयांत ऑनलाईन सेल्फ पेस्ड (स्वयंगती) कोर्सची (https://www.mahayouthnet.in/) अंमलबजावणी सुरू आहे. त्याचप्रमाणे, संदर्भ क्रमांक १ नुसार राज्यातील निवडक तेरा जिल्ह्यांमध्ये नैसर्गिक संसाधने व पाण्याची बचत या अभियानांतर्गत सर्व महाविद्यालयांत ग्रीन क्लब स्थापन करवून विविध उपक्रम राबविले जात आहेत. पाणीबचतीच्या उपाययोजनांसाठी ग्रीन क्लब च्या माध्यमातून सात सहज करण्याजोग्या कृती योजना राबविणे अपेक्षित आहे. यामध्ये गळक्या नळांची दुरुस्ती, शॉवर एवजी बादलीने पाणी वापरणे, दात घासताना किंवा दाढी करताना पाणी वाया जाणार नाही याची काळजी घेणे, ग्रामीण भागात शोष खड्डे व पाझर खड्डे बनविण्यास प्रवृत्त करणे इत्यादी उपक्रम संबंधित महाविद्यालयातील ग्रीन क्लबने करणे अपेक्षित आहे.

ज्या प्रमाणे ऑनलाईन सेल्फ पेस्ड (स्वयंगती) कोर्स राज्यभर राबविला जातो आहे त्याप्रमाणे राज्यातील सर्व महाविद्यालयांत जागतिक जल दिन साजरा करण्याचे सूचित करण्यात येत आहे. जागतिक जलदिनाच्या निमित्ताने यशस्वी उपक्रम राबविल्यास खालील प्रमाणे पुरस्कार देण्यात येतील.

**ऑनलाईन सेल्फ पेस्ड (स्वयंगती) कोर्सबाबत पुरस्कार**: ऑनलाईन सेल्फ पेस्ड (स्वयंगती) कोर्सची उत्कृष्टरित्या अंमलबजावणी करणाऱ्या महाविद्यालयांना विभागनिहाय पुरस्कार देण्यात येतील (१० विभाग- ३० पुरस्कार)

**ग्रीन क्लब प्रोत्साहनपर पुरस्कार**: जागतिक जल दिवसाच्या निमित्ताने आयोजित उत्कृष्ट काम करणाऱ्या (अभियानातील) १३ जिल्ह्यातील ग्रीन क्लब यांना प्रोत्साहनपर पुरस्कार देण्यात येणार आहेत. जागतिक जल दिनाचे उपक्रम विशेष व नाविन्यपूर्ण पद्धतीने राबवावे. हे उपक्रम उकृष्टरित्या राबविणाऱ्या उच्च व तंत्र शिक्षण विभागातील जिल्हानिहाय प्रथम तीन ग्रीन उत्कृष्ट क्लब यांना प्रोत्साहनपर पुरस्कार (एकूण १३ जिल्हे- ३९ पुरस्कार ) देण्यात येतील. राज्य स्तरावर उत्कृष्ट काम करणाऱ्या पाच (५) ग्रीन क्लब यांना प्रोत्साहनपर पुरस्कार देण्यात येतील. ग्रीन क्लबने खालील प्रमाणे उपक्रम राबवावे. यासाठीच्या मार्गदर्शक सूचना व पुरस्कारासाठी निवडीचे निकष खालील प्रमाणे

| उपक्रम/स्पर्धेचा प्रकार | तपशील | निवडीचे निकष |
|---|---|---|
| **ऑनलाईन सेल्फ पेस्ड (स्वयंगती) कोर्सबाबत पुरस्कार** | १. https://www.mahayouthnet.in/ या साईट वरून विद्यार्थ्यांनी कोर्स पूर्ण करावा<br>२. यासाठी महाविद्यालयात जागृतीपर उपक्रम राबवावे उदा. परिपत्रक, नोटीस, कोर्स बाबत चे साहित्य प्रसार<br>३. कोर्स पूर्ण केलेबाबतचा अहवाल: http://tinyurl.com/WWD-YLCA-Course-Status | १. महावियालयात असलेल्या एकूण विद्यार्थ्यांची संख्या व त्याप्रमाणात (% मध्ये) कोर्स पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या<br>२. कोर्स पूर्ण केलेबाबत चा महाविद्यालयाचा अहवाल |
| **उत्कृष्ट ग्रीन क्लब** | १. व्हाय वेस्ट वरील विद्यार्थी नोंदणी व दैनंदिन वापर<br>२. ग्रीन क्लब अंतर्गत पाणी बचतीच्या अनुषंगाने राबवण्यात आलेल्या विविध स्पर्धा व कार्यक्रम.<br>३. 'युथ लीडरशिप फॉर क्लायमेट एक्शन' हा ऑनलाईन सेल्फ-पेस्ड कोर्स पूर्ण करणे. | १. व्हाय वेस्ट वरील कॉलेजची रँक<br>२. ग्रीन क्लब अंतर्गत राबवण्यात आलेल्या विविध स्पर्धा व कार्यक्रम यांचे ऑनलाईन गूगल फॉर्मच्या माध्यमातून पाठवलेले अहवाल<br>३.' युथ लीडरशिप फॉर क्लायमेट एक्शन' हा ऑनलाईन सेल्फ-पेस्ड कोर्स पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांची यादी व प्रमाणपत्रे |
| **ग्रीन क्लब अंतर्गत पाणी बचतीच्या अनुषंगाने राबवण्यात आलेल्या विविध स्पर्धा व कार्यक्रम.** | | |

| | | |
|---|---|---|
| गळक्या नळांची दुरुस्ती करणे**;** | या कृतीद्वारे 'युवकांच्या (youth students) मार्फत नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण व पाण्याची बचत ' अभियानातील पाणी बचतीची नोंद घेण्यासोबतच महाविद्यालयातील 'पाणी पुरवठा साधनांची (पाण्याच्या टाक्या, नळ, पाईपलाईन, इत्यादी) सुनिश्चितता' करवून यावर्षीच्या जागतिक जल दिन संकल्पनेला साध्य करण्यास मदत होईल. यासाठी संबंधित महाविद्यालयांनी व ग्रीन क्लबने आवश्यक कार्यवाही करावी.<br>उदाहरणासाठी मुद्दे /टप्पे खालील प्रमाणे<br>१. गळक्या नळांचा/टाक्यांचा शोध<br>२. गळक्या नळातून होणाऱ्या पाण्याच्या नुकसानीचा अभ्यास व नोंद<br>३. ग्रीन क्लब च्या माध्यमातून महाविद्यालय प्राचार्य व प्रशासन यासोबत गळक्या नळांची, टाकीची व इतर साधनांची दुरुस्ती करण्यासाठी चर्चा व प्रस्ताव<br>४. गळक्या नळांची दुरुस्ती करणे 'सत्र आयोजित करण्यात यावे.<br>५. प्रत्यक्षात दुरुस्ती | १.गळक्या नळांची, टाकीची व इतर साधनांची प्रत्यक्षात दुरुस्ती<br>२. गळक्या नळांच्या दुरुस्ती चा अहवाल<br>३. नळ दुरुस्तीच्या चर्चा आणि प्रत्यक्षात सामील झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या |
| दात घासताना किंवा दाढी करताना पाणी वाया जाणार नाही याची काळजी घेणे, ग्रामीण भागात शोष खड्डे व पाझर खड्डे बनविण्यास **प्रवृत्त करणे बाबत प्रात्यक्षिक** | 'युवकांच्या (youth students) मार्फत नैसर्गिक संसाधनांचे सरंक्षण व पाण्याची बचत' अभियानात पाणी बचतीच्या सात सहज करण्याजोग्या उपाययोजना बाबत वेळोवेळी प्रशिक्षण व संवाद साहित्य (https://tinyurl.com/YEWS-Resource-Material ) पुरविण्यात आले प्रमाणे खालील कृती करता येऊ शकते<br>१. पाणी बचतीच्या सातही उपाययोजना बाबत चर्चा घडवून आणावी<br>२. चर्चेअंती प्रात्यक्षिक करणेबाबत कृती आराखडा तयार करण्यात यावा<br>३. प्रत्येक उपाययोजना बाबत प्रात्यक्षिक करण्यात यावे.<br>४. उपक्रमातील काही उपाययोजना बाबत प्रात्यक्षिक करण्यात साधनांची व संसाधन व्यक्तींची आवश्यकता असल्यास स्थानीक संसाधनांचा वापर करावा<br>५. वरील प्रात्यक्षिके आवश्यक ती काळजी घेऊन समुदायामध्ये प्रात्यक्षिके करणे | १. प्रात्यक्षिक मध्ये सामील सामील झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या<br>२. विद्यार्थ्यांनी आपले समुदाय, सोसायटी, कॉलोनी, गाव, इथे केलेली प्रात्यक्षिके |

| | | |
|---|---|---|
| पाणी बचतीवर पोस्टर तयार करणे | १. जागतिक जल दिन आणि पाणी बचतीच्या व्यक्तिगत सवयीमध्ये बदल या विषयावर पोस्टर बनवणे.<br>२. मराठी, हिंदी व इंग्रजी इत्यादी भाषेचा वापर करता येईल.<br>३. ग्रीन क्लब मधील सदस्य यांना सहभाग घेता येईल.<br>४. ग्रीन क्लब फॅकल्टी कोऑर्डीनेटर यांनी आपल्या महाविद्यालयात पोस्टर प्रदर्शन स्पर्धेचे आयोजन करावे.<br>५. ग्रीन क्लब फॅकल्टी कोऑर्डीनेटर यांनी ऑनलाईन गूगल फॉर्मच्या माध्यमातून पोस्टर पाठवावे. लिंक:- http://tinyurl.com/WWD-YEWS-Posters | १. ग्रीन क्लब फॅकल्टी कोऑर्डीनेटर यांनी आपल्या महाविद्यालयात पोस्टर प्रदर्शन स्पर्धेचे आयोजन करुन पोस्टरचे मूल्यांकन करावे व त्यातील उत्कृष्ट तीन (३) पोस्टरची निवड करून जिल्हास्तरीय निवडीस पाठवावी.<br>२. ग्रीन क्लब फॅकल्टी कोऑर्डीनेटर यांच्या मार्फत प्राप्त पोस्टरचे मूल्यांकन जिल्हा नोडल अधिकारी व संबंधित डिट्रिक्ट रिसर्चर करतील व निवड करून उत्कृष्ट दहा (१०) पोस्टर राज्यस्तरीय निवडीस पाठवतील<br>३. अभियानाशी सबंधित जिल्हा नोडल अधिकारी व संबंधित डिट्रिक्ट रिसर्चर यांनी निवड करून पाठवलेल्या पोस्टरचे मूल्यांकन राज्यस्तरावरील टीम मार्फत केले जाईल. |
| **रिल/शॉर्ट व्हिडीओ** | १. जागतिक जल दिन आणि पाणी बचतीच्या व्यक्तिगत सवयीमध्ये बदल या विषयावर सबंधित महाविद्यालयातील ग्रीन क्लबच्या माध्यमातून एक रिल/शॉर्ट व्हिडीओ बनवणे.<br>२. मराठी, हिंदी व इंग्रजी इत्यादी भाषेचा वापर करता येईल.<br>३. वेळ मर्यादा:- रिल/शॉर्ट व्हिडीओ दोन(२) मिनिट पेक्षा जास्त वेळाचा नसावा.<br>४. ग्रीन क्लब फॅकल्टी कोऑर्डीनेटर यांनी ऑनलाईन गूगल फॉर्मच्या माध्यमातून रिल/शॉर्ट व्हिडीओ पाठवावे. लिंक:- http://tinyurl.com/WWD-YEWS-Reels | १. ग्रीन क्लब फॅकल्टी कोऑर्डीनेटर यांच्या मार्फत प्राप्त रिल/शॉर्ट व्हिडीओ मूल्यांकन जिल्हा नोडल अधिकारी व संबंधित डिट्रिक्ट रिसर्चर हे प्राप्त रिल/शॉर्ट व्हिडीओ पैकी निवड करून उत्कृष्ट दहा (१०) रिल/शॉर्ट व्हिडीओ राज्यस्तरीय निवडीस पाठवतील.<br>२. अभियानाशी सबंधित जिल्हा नोडल अधिकारी व संबंधित डिट्रिक्ट रिसर्चर यांनी निवड करून पाठवलेल्या रिल/शॉर्ट व्हिडीओ मूल्यांकन राज्यस्तरावरील टीम मार्फत केले जाईल. |
| **सोशल मीडिया पोस्ट:** प्रशिक्षणात सहभाग व ग्रीन क्लब च्या उपक्रमाबाबत सोशल मीडिया पोस्ट | १. दिनांक १७ फेब्रुवारी २०२३ पासून सुरु होणाऱ्या ग्रीन क्लब अभियान समानव्यक (विद्यार्थी-Green Club Campaign Coordinator) यांनी प्रशिक्षणात सहभागी व्हावे<br>३. प्रशिक्षणादरम्यान सूचित केल्याप्रमाणे सोशल मेडिया अकाउंट उघडणे<br>४. प्रशिक्षणात पश्चात योग्य व ग्रीन क्लब प्राध्यापक समन्वयक यांच्या मान्यतेने सोशल मीडिया पोष्ट करणे. यासाठी खालील अकाउंट ना टॅग करता येऊ शकतो. Global and National: @UN_Water #jaljeevan_ #swachhbharat #MissionLiFE<br>State and partners: #mahagreenclub #majhivasundhara #CMOMaharashtra #htedmaharashtra #ChDadaPatil #WhyWasteOrg #CEEahmedabad #myca_climate | १. अकाउंट ओपन केलेबाबत ची ग्रीन क्लब मध्ये नोंद<br>२. जागतिक जल दिन व ग्रीन क्लब उपक्रमाबाबत च्या एकूण केलेल्या सोशल मीडिया पोष्ट |

वरील प्रमाणे उपक्रम राबवून त्याबाबतचा सचित्र अहवाल https://tinyurl.com/YEWS-Green-Club-Action या ग्रीन क्लबच्या आक्टिविटी रिपोर्ट लिंकद्वारे दि. १५.०३.२०२४ रोजी पर्यंत सादर करावा, विहित मुदती नंतर आलेल्या अहवालांचा ग्रीन क्लब प्रोत्साहनपर पुरस्काराच्या अंतिम निवड करण्यासाठी विचार करण्यात येणार नाही. प्रोत्साहनपर देण्यात येणाऱ्या पुरस्कारा संदर्भातील विस्तृत माहिती माहे फेब्रुवारी अखेरीस स्वतंत्र परिपत्रकाद्वारे कळवण्यात येईल.

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण)
राज्य कार्यक्रम सचिवालय, अध्यक्ष (प्रोग्राम सेक्रेटरिएट)
महाराष्ट्र राज्य, पुणे – १६

प्रत माहिती व उचित कार्यवाहीस्तव:

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.

मा. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.

मा. प्रधान सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.

मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.

संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.

प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, तथा राज्य नोडल अधिकारी.

राज्य संपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.) तथा नोडल अधिकारी.

मुख्य क्षेत्रीय अधिकारी (CFO), युनिसेफ महाराष्ट्र, मुंबई.

कार्यकारी संचालक, ॲडवान्सड सेंटर फॉर वॉटर रिसोर्सेस डेव्हलपमेंट अँड मॅनेजमेंट (ॲक्वाडॅम), पुणे.

प्रकल्प समन्वयक, 'युवकांच्या (Youth) मार्फत नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण व पाण्याची बचत संयुक्त अभियान'.

स्टेट लाइजनिंग ऑफिसर, 'युवकांच्या (Youth) मार्फत नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण व पाण्याची बचत संयुक्त अभियान'(YEWS).